# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 2264 1150/51, 30333447 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


जाहीर सूचना क्रमांक: २अ/एडीएम/अनधिकृतसंस्था/२०१९/ ९६४

मान्यता नसलेल्या विद्यापीठ /मंडळ /अनधिकृत संस्थाबाबत दिनांक : 16 FEB 2019

**मान्यता नसलेल्या विद्यापीठ/मंडळ/ अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी , पदव्युत्तर पदविका ( Diploma, UG Degree, PG Degree, PG Diploma ) या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये या संचालनालयामार्फत राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी इत्यादी पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येणार असून प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मार्फत राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, बी.प्लॅनिंग, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी, फार्म.डी.(Post Bacclaureate), फार्म. डी. व एम.ई./एम.टेक. एम.आर्च., एम.प्लॅनिंग,एम.एचएमसीटी या पदव्युत्तर पदवी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/विद्यापीठे/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in **या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविले जाणारे अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/ माहिती उपलब्ध आहे.**

येथे असे नमूद करण्यात येते की, **महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यासक्रम पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदाअनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यासक्रम/पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे.** व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/ विद्यापीठ अनुदान आयोग/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ, मंडळ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व **प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या , मंडळाच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची संलग्नता व मान्यता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा.** उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/मंडळ/विद्यापीठाच्या संलग्नतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

(डॉ. अभय वाघ)

संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

D:\Admission २०१९-२०\notification not to take admission २०.०३.२०१८-२.docx